साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

वर्ष 31 वे

| परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com

नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१५८ | पाने-१२ | दि.२९/१२/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.

॥ श्री कोटलिंग प्रसन्न ॥
स्थलांतर.. स्थलांतर..
शिवम
स्टिल ॲन्ड सिमेंट एजन्सी
मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी..!
टी.एम.टी.बार चे अधिकृत विक्रेते
खडी, क्रॅशसॅण्ड योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : अमोल बबन टवळे
(9850125561, 9423339966)
पत्ता : नगर-सोलापूर बायपास रोड, निलज चौक, संत निरंकारी मंडळ, शेजारी, करमाळा.
आयकॉन स्टीलचे अधिकृत विक्रेते

# कोरडवाहू शेती संशोधन केंद्रातील समस्या दूर करण्याची व रिक्त पदे भरण्याची तातडीने गरज

करमाळा : शेलगाव येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत कोरडवाहू शेती संशोधन उपकेंद्रामध्ये अनेक समस्या आहेत. सदरच्या समस्या दूर करण्याची गरज आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे येथील रिक्त पदे तातडीने भरण्याची गरज आहे.

सदरचे कोरडवाहू संशोधन केंद्र हे बागायत भागात उजनीच्या नजीक आहे. परंतु येथे उजनीवरून अद्यापही पाईपलाईन केलेली नाही. वीज पूर्णवेळ नसल्याने व रात्रपाळीला कामगार मिळत नसल्याने पिकाला पाणी देण्याची मोठी गैरसोय होते. या केंद्रावरती पूर्वी दूरध्वनी होता, त्याचा क्रमांक ०२१८२-२०२०१८ असा होता. तो बंद पडला असून शेतकऱ्यांना संपर्क साधण्यासाठी केंद्राला कोणताही नंबर नाही. सदरचे संशोधन केंद्र कार्यान्वीत करण्यासाठी शासनाने सर्व प्रकारची तातडीने मदत करण्याची गरज आहे; अशी मागणी या भागातील शेतकरी भारत नाना रोकडे यांनी केली आहे.




● सन १९४१ ला स्थापना ● एकूण क्षेत्र १९ हेक्टर ● वहितेखालील क्षेत्र १६ हेक्टर ● एक विहिर हंगामी पाण्याची,
**सुविधा :** पाऊस, तापमान, हवामान, बाष्पीभवन, वाऱ्याची दिशा, ओले तापमान, कोरडे तापमान, हवेचा दाब मोजण्याची यंत्र उपलब्ध

कोरडवाहू शेती संशोधन केंद्रात यावर्षी १५०१२ या सुधारीत जातीच्या ऊसाचे बियाणे निर्माण केले होते. त्याची नुकतीच विक्री केली आहे. करडईचे दोन प्लॉट आहेत. ज्वारी बियाणाचे फुले रेवती जातीची दोन हेक्टर लागवड आहे. तीन एकरात ऊसाची लागवड आहे. त्यामध्ये ८६०३२ व १५०१२ या जातीचे बियाणे आहे. खरीपात सोयबीनचे बियाणे घेतले आहे. संशोधन केंद्राच्या जमिनीला चारही बाजूने कंपाऊंडची गरज आहे. बाहेरची जनावरे येऊन बरेचसे नुकसान करत आहेत. तसेच ज्युनियर रिसर्चची जागा रिक्त असून लेबरचीही तीन पदे रिक्त आहेत. सर्व पदे भरल्याशिवाय पूर्ण काम करता येत नाही. ...डॉ.एस.एस.नवले (प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केंद्र)

सस्नेह निमंत्रण
॥ श्री गजानन प्रसन्न ॥ श्री खंडोबा प्रसन्न ॥ श्री तुळजाभवानी प्रसन्न ॥ श्री नागनाथ प्रसन्न ॥
आशिर्वाद
आशिर्वाद
चि.आशिष
कै.कल्याण उध्दव गायकवाड यांचे सुपुत्र व श्री.सतीश उध्दव गायकवाड यांचे पुतणे रा.देवळाली, ता.करमाळा
चि.सौ.कां.गौरी (शुभांगी)
श्री.प्रकाश बबन कानगुडे रा.देवळाली, ता.करमाळा, जि.सोलापूर यांची द्वितीय सुकन्या
चि.सौ.कां.सलोनी
कै.कल्याण उध्दव गायकवाड यांची पुतणी व श्री.बाळासाहेब आप्पा गायकवाड यांची द्वितीय सुकन्या रा.देवळाली, ता.करमाळा
चि.लखन
श्री.विलास चंद्रहास नलवडे रा.बाळेवाडी, ता.करमाळा यांचे सुपुत्र
चि.सौ.कां.स्नेहा
कै.कल्याण उध्दव गायकवाड यांची पुतणी व श्री.सतीश उध्दव गायकवाड रा.देवळाली, ता.करमाळा यांची ज्येष्ठ सुकन्या
चि.रविराज
श्री.नागनाथ बापुदेव निंभोरकर रा.भोगेवाडी, ता.माढा यांचे सुपुत्र
चि.ऋषिकेश
कै.कल्याण उध्दव गायकवाड यांचे पुतणे व श्री.दिलीप उध्दव गायकवाड रा.देवळाली, ता.करमाळा यांचे सुपुत्र
चि.सौ.कां.अनुश्री
श्री.दत्तात्रय उत्तम शिंदे रा.देवळाली ता.करमाळा यांची द्वितीय सुकन्या
विवाहस्थळ
देवळाली
करमाळा-जेऊर रोड
ता.करमाळा, जि.सोलापूर
यांचा
शुभविवाह
शुक्रवार दि.५/१/२०२४ रोजी सायं ६ वा. २१ मि. या शुभमुहूर्तावर संपन्न होणार आहे. तरी या शुभप्रसंगी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे !
टीप
सर्वांना निमंत्रण पत्रिका दिलेल्या आहेतच. नजरचुकीने कोणास मिळाली नसल्यास हेच निमंत्रण समजून शुभकार्यास अगत्य येण्याचे करावे, ही नम्र विनंती !
आपले नम्र
समस्त गायकवाड परिवार, देवळाली

नवीन वर्षाचे स्वागत करताना मागे काय केले हे पण पाहणे आवश्यक आहे.

**संपादकीय...........................................!**

# सन २०२३ चा लेखा-जोखा

सन २०२३ मध्ये फार उल्लेखनीय अशा घटना घडल्या; असे वाटत नाही. तरीही या वर्षातील विशेष गोष्ट म्हणजे ज्या बाजार समितीच्या निवडणुकीसाठी गेल्या अनेक निवडणुकामध्ये सतत वादावादी, मारामारी, न्यायालयीन लढाई झालेल्या आहेत. थोडक्यात सतत वादग्रस्त राहिलेली बाजार समितीची निवडणूक यावेळी चक्क बिनविरोध पार पडली. आणखी एक विशेष म्हणजे नगरपालिकेवर प्रशासक, करमाळा अर्बन बँकेवर प्रशासक,आदिनाथ कारखान्यावर प्रशासक तसेच जिल्हा परिषद, पंचायत समितीचे पदाधिकारी बरखास्त तिथेही अधिकाऱ्यावरच कारभार सुरू आहे. तहसीलदार पद रिक्त, काही काळ बीडीओ प्रभारी, काही काळ प्रांताधिकारी पद रिक्त अशाप्रकारे अधिकारी व पदाधिकाऱ्याच्या गैरहजेरीत कारभार चालणारे हे वर्ष म्हणून विशेष नोंद घ्यावी लागेल. यावर्षी तालुक्यात केळीचे मोठ्या प्रमाणात उत्पादन झाले व मोठ्या प्रमाणात केळी निर्यात झाली. पावसाचे प्रमाण कमी, उजनी व कोळगावसह अन्य तलाव तळपातळीकडे जात आहेत. याशिवाय मकाईचे ऊस बिल मिळण्यासाठी आंदोलन, मराठा आरक्षण आंदोलन यामुळेही हे वर्ष गाजले आहे. उद्योग क्षेत्रामध्ये ज्या चार साखर कारखान्यामुळे करमाळा तालुक्याचे नाव महाराष्ट्रात घेतले जाते, तीच साखर कारखानदारी यावर्षी खूपच अडचणीत आली. मकाई कारखाना सुरू झाला नाही, आदिनाथ सुरू झाला पण साखर बाहेर पडली नाही. भैरवनाथ शुगर व कमलाभवानी शुगर हे कारखाने सुरू आहेत पण एकही दिवस पुर्ण क्षमतेने चालले नाहीत. याउलट बाहेरचे कारखाने करमाळ्याच्या ऊसावर जोरदार चालले आहेत. महत्वाची बाब म्हणजे करमाळा येथे अनंत प्रयत्नानंतर वरीष्ठ दिवाणी न्यायालयाचा प्रारंभ झाला आहे.

यावर्षी करमाळा अर्बन बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध झाली, सभासदांनी कन्हैय्यालाल देवी यांच्यावर विश्वास टाकला पण प्रशासनाने अविश्वास दाखवून बँकेवर चक्क प्रशासकाची नेमणूक केली. तालुका खरेदी-विक्री संघ निवडणूक बिनविरोध झाली त्यावर जगताप गटाचे वर्चस्व तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक बिनविरोध त्यातही जगताप गटाचे वर्चस्व आहे. मकाई कारखाना निवडणूक झाली पण त्यात बागल गटाने यश मिळवले. या निवडणुकीत बागल गटाचे नेते निवडणुकीला न उभे राहताही त्यांचे नेतृत्व त्यांनी अबाधित ठेवले, पण ऊस उत्पादकांची बिले न दिल्याने बागल गटाला जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागले आहे.

उद्योग क्षेत्रातील यशस्वी वाटचालीबद्दल सोमनाथ खराडे (वांगी नं.३) यांना स्टार्टअप पुरस्कार, शैक्षणिक कार्याबद्दल मुकूंद साळुंखे यांना राज्यस्तरीय स्वामी विवेकानंद संस्कारक्षम पुरस्कार, विजय कोळेकर(रावगाव) यांना आदर्श शिक्षक/मुख्याध्यापक पुरस्कार, गिरधरदास देवी विद्यालयास जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार, श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठानच्या संचालिका सुनिता देवी यांना जीवनगौरव पुरस्कार, रामवाडीचे अजित रणदिवे यांना आदर्श एकत्र कुटूंब पुरस्कार, ॲड.विजय कोकरे (कुगाव) यांना राज्यस्तरीय केळीरत्न पुरस्कार, गणेश करे-पाटील यांना क्रांतीसुर्य सत्यशोधक समता पुरस्कार, मनिषा बाभळे-पेटकर यांना राज्यशासनाचा आदर्श शिक्षिका पुरस्कार, विलासराव घुमरे यांना दामाजी एक्सप्रेसचा शिक्षणरत्न पुरस्कार, बाळासाहेब बोडखे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, नामसाधना विद्यामंदिर न.पा.शाळेस आदर्श शाळा पुरस्कार, श्रेणिक खाटेर यांना संगीतरसिक पुरस्कार, ॲड.शहानूर सय्यद यांना वर्ल्ड पार्लमेंट इंटरनॅशनल पुरस्कार, तुषार शिंदे (कंदर) इंडियन फॉरेस्ट ऑफिसर निवड, केळी उत्पादक संघाच्या जिल्हाध्यक्ष पदी महेंद्र पाटील निवड, भारत शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव पदी प्रा.अर्जुन सरक निवड, राज्य योगासन स्पर्धेत अनुराधा राऊतचे यश, श्रीहरी जाधव (भिवरवाडी) यांचेकडून प्रथमच सौरऊर्जेवर चालणाऱ्या लॉंचची निर्मिती, पोथरे येथे मातृ-पितृ पुजन सोहळा, मंगेश बदर दिग्दर्शित मदार चित्रपटाची फ्रान्स येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात निवड, रोहिणी नगरे यांची इंडोनेशिया येथे आंतरराष्ट्रीय सोमी संघटनेच्या परिषदेसाठी निवड, छोटूमिया पिक्चर टॉकीज शुभारंभ, कमलादेवी मंदिर जतन व संवर्धनाच्या कामाचा शुभारंभ, मराठा योध्दा मनोज जरांगे-पाटील यांची वांगी नं.१ येथे पहाटे ४ वाजता सभा , कुंभारगाव येथील शिवमहापुराण कथेचा भव्य कार्यक्रम, स्व.दिगंबरराव बागल मामा यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेले भव्य कृषी प्रदर्शन तसेच १६ ग्रामपंचायत निवडणूका शांततेत संपन्न, करमाळा तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्था निवडणूकही संपन्न झाली.

यावर्षात अनेक महत्वाच्या व्यक्ती आपणाला सोडून गेल्या. त्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सहकार्यवाह मदनदास देवी, माजी उपसभापती विलास पाटील (झरे), वकिल संघाचे माजी अध्यक्ष ॲड.आजिनाथ शिंदे, उद्योजक मनोज गायकवाड,बालसाहित्यिक चंद्रकांत इंदुरे, ग्राहकपंचायतचे भालचंद्र पाठक, गायनसम्राट बंडोपंत कुलकर्णी, माजी उपसरपंच ज्ञानदेव दळवी (बिटरगाव श्री), गीतादेवी आगरवाल, माजी मुख्याध्यापक तुळशीराम लोंढे-पाटील (केम), आनंदमती नेमचंद दोशी, केंद्रप्रमुख शिवाजी जगताप, गोविंदबापू पाटील पतसंस्थेचे संचालक श्रीराम पाटील (लव्हे), ज्ञानदेव सुरवसे (भोसे), युवक सुरज कांबळे, अनिल ससाणे गुरूजी , माजी सरपंच माणिकराव साखरे (राजुरी), शांताबाई कांबळे, पांडूरंग सोरटे, जि.प.चे माजी सदस्य शिवाजी झोळ (वाशिंबे), किराणा व्यापारी दिलीप कटारिया, ललिता अभय येवले, कांतीलाल सोळंकी, मेजर दत्तात्रय मुसळे, शरद पुराणिक (श्रीदेवीचामाळ), सुलभाबेन मेहता, रंगनाथ आडाणे, अशोक दहिदुले, , आशिष जव्हेरी, करमाळा आगारातील संजय माने यांचे निधन. तसेच सालसे रस्त्यावर करमाळा शहरातील मनोज काळे व पुष्पा काळे या दांम्पत्याचे अपघाती निधन ही घटना नागरीकांच्या मनाला चटका लावून गेली

## भव्य खुल्या बुध्दीबळ स्पर्धा संपन्न




करमाळा : करमाळा चेस असोसिएशन व यशकल्याणी सेवाभावी संस्था यांच्या वतीने करमाळा येथे नुकत्याच भव्य खुल्या बुध्दीबळ स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उद्‌घाटन यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे–पाटील यांचे हस्ते झाले. यावेळी मेडिकल असो; चे सचिन साखरे उपस्थित होते. सुत्रसंचालन माध्यमिक शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष मुकूंद साळुंके यांनी केले. या स्पर्धेत नगर,सोलापूर, पुणे जिल्ह्यामधून एकूण ८४ स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय मानांकित एकूण ११ खेळाडूंनी सहभाग नोंदवला. अत्यंत अटीतटीच्या लढतीत खुल्या गटात प्रथम क्रमांक शंकर साळुंके रोख रक्कम ३ हजार रू व ट्रॉफी., वयोगट १५ मध्ये प्रसन्न जगदाळे रोख १ हजार रू. व ट्रॉफी, वयोगट ११ मध्ये सान्वी गोरे रोख ७०० रू. व ट्रॉफी यांनी विजय संपादन केला. सदर स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून गणेश मस्कले (स्टेट आरबिटर), सहाय्यक पंच शंभु मेरूकर, पंगुडवाले विजय, सुभाष उपासे होते. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे.. द्वित्तीय क्रमांक – प्रज्वल कोरे, तृतीय क्रमांक – नितीन आगरवाल, चौथा क्रमांक – विजय पंगुडवाले, पाचवा क्रमांक – श्रीकांत मुचिंडकर, सहावा क्रमांक – रिध्दी उपासे , सातवा क्रमांक – रेणुका मारणे, आठवा क्रमांक – संतोष कुरूंद, नववा क्रमांक – निखिल राठोड, दहावा क्रमांक – नवीना वाडीशेरला.

वयोगट १५ मध्ये – व्दित्तीय – मेघराज शिंदे, तृतीय – आदित्य भिंगारे, चतुर्थ – संस्कार कांबळे, पाचवा – विश्वजीत जाधव, सहावा – भास्कर भार्गव, सातवा – वेद आगरकर, आठवा – तन्वीर सरडे, नववा – श्रेया सुर्यवंशी, दहावा – पवन जमादार

वयोगट ११ मध्ये – प्रथम – सान्वी गोरे, द्वित्तीय – ऋषीकेश राठोड, तृतीय – भार्गव पाटील, चौथा – सिध्दांत कोठारी, पाचवा – अनन्या उलभगत, सातवा – विवान अर्कल, आठवा – शाश्वत पाथरूडकर, नववा – वेदांत पांडेकर, दहावा – ज्योती खंडागळे

करमाळा शहर व तालुक्यासाठी बक्षीसे पुढीलप्रमाणे... ओपन गट : प्रथम – अमोल राठोड, द्वित्तीय – बलराम परदेशी, तृतीय – संमेद दोशी, चौथा – ओंकार देशमुक, पाचवा – कृष्णा मेरूरकर, सहावा – सीतापुरे, सातवा – युवराज पंडित. वयोगट १५ मध्ये प्रथम – अथर्व राठोड, व्दित्तीय – प्रतिक नामदे, तृतीय – सार्थक गांधी, चौथा – ऋषभ गुगळे, पाचवा – राजवीर पठाडे, सहावा – अथर्व बरीदे, सातवा – संमेद कोकीळ. वयोगट ११ मध्ये प्रथम – अंश राठोड, द्वित्तीय – सिध्दी देशमुख, तृतीय – देवराज कन्हेरे, चौथा – श्वेतांजली जाधव, पाचवा – अक्षिता क्षीरसागर, सहावा – प्रबंजन लावंड

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# कवितेनं माझ्यासाठी हा रस्ता बनवला : कवियित्री वेदपाठक



करमाळा(सं.प्र.) : करमाळ्याला येण्यासाठी कवितेनं माझ्यासाठी हा रस्ता बनवला आहे; असे भावनिक विचार बुधभूषण पुरस्कार प्राप्त कवियत्री प्राजक्ता वेदपाठक यांनी व्यक्त केले.

करमाळा तालुका साहित्य मंडळाच्या वतीने कवियत्री प्राजक्ता वेदपाठक यांच्या 'तु चिरंतन कविता माझी' या कवितासंग्रहास राज्यस्तरीय बुधभूषण पुरस्कार देण्यात आला, त्यावेळी सत्काराला उत्तर देताना श्रीमती वेदपाठक बोलत होत्या. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, स्त्रीरोग तज्ञ डॉ.कविता कांबळे, साहित्य मंडळाचे अध्यक्ष प्रकाश लावंड आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना प्राजक्ता वेदपाठक म्हणाल्या, की जीवनाचा आशय हा कवितेचा आत्मा असतो. त्यामुळे कवितेत यमक अथवा अन्य बाबी महत्वाच्या नसतात. छंदही महत्वाचा नाही. परंतु जो आशय मांडायचा आहे तो परिपूर्ण असावा लागतो. तेव्हाच ती कविता हृदयात आरपार शिरते. कविता ही सहज साधी सोपी नसते. माझ्यावर कोरोनात संकट कोसळले. माझे पती गेले. एवढा मोठा दु:खाचा डोंगर पण मी या कवितेतून सावरले आहे. पुणे सारख्या शहरात मी आयटी क्षेत्रात असताना आज करमाळ्याचा जो अनुभव आहे तो फार वेगळा आहे. हा अनुभव मला आणखी काम करण्याची उमेद देणारा ठरेल.

यावेळी तालुका साहित्य मंडळाच्या वतीने शालेय महाविद्यालयीन व खुल्या गटातील कविता स्पर्धा घेतल्या होत्या. त्यामध्ये शालेय गटात अभियंता मधुकर खडके स्मृति पुरस्कार साक्षी ढेरे, अपूर्वा पवार व तन्वीर दवणे यांना अनुक्रमे तृतीय, द्वितीय व प्रथम क्रमांक मिळाले आहेत. महाविद्यालयीन गटात गुरूवर्य सुमेरसिंग परदेशी स्मृति पुरस्कार दिपाली राऊत, अर्चना शिंदे व ऋतुजा सरतापे यांना अनुक्रमे तृतीय, द्वितीय व प्रथम क्रमांक मिळाले आहेत. खुल्या गटात प्राचार्य प्रभाकर बिडवे स्मृति पुरस्कार संजय अवघडे, प्रज्ञा दिक्षित व रेश्मा दास यांना अनुक्रमे तृतीय, द्वितीय व प्रथम क्रमांक मिळाले आहेत. तर विशेष सन्मान गावगाडा पुरस्काराचे पुरस्कर्ते कवी सोमनाथ टकले यांना देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे खजिनदार डॉ.सुनिता दोशी यांनी केले तर कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन ॲड.प्राची सरवदे यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन कवी खलील शेख, दादासाहेब पिसे, मंडळाचे उपाध्यक्ष प्राचार्य नागेश माने, विश्वस्त किरण गायकवाड, संतोष कांबळे, विशाल पाटमास, मोरेश्वर पवार आदींनी केले.

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना
श्रीजय नेत्र रूग्णालय
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

## कुस्तीमध्ये दिलेल्या योगदानाबद्दल

# माजी आमदार नारायण पाटील यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.) : कुस्तीमध्ये दिलेल्या योगदानाबद्दल माजी आमदार नारायण पाटील यांना निमगाव (केतकी), ता.इंदापूर येथील ग्रामस्थांकडून जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. हा जीवन गौरव पुरस्कार सुवर्णयुग गणेश मंदिर ट्रस्ट विश्वस्तांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी मल्ल सम्राट रावसाहेब मगर, महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर, रविंद्र माळवदकर, पै.उत्तम दादा फरतडे, प्रशांत भागवत, शरद झोळ, प्रविण ठवरे, सुभाष झोळ, मच्छिंद्र चांदणे, भगवान घाडगे, दशरथ बनकर, सुर्यकांत महामुनी यांचेसह पाटील गटाचे कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

निमगाव (केतकी) येथील कुस्तीच्या आखाड्यात हा भव्य सोहळा पार पडला. माजी आमदार नारायण पाटील यांनी सन १९८५ ते सन १९८८ या सलग चार वर्षात ७४ किलो वजन गटात महाराष्ट्रात प्रथम येण्याचा विक्रम केला होता. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या चार अधिवेशनात त्यांनी सलग चार सुवर्णपदके जिंकली होती. तसेच ७४ किलो वजन गटात ग्रीको रोमन या कुस्ती प्रकारामध्ये त्यांनी राष्ट्रीय सुवर्ण पदक मिळविले होते व देशात प्रथम येण्याची कामगिरी करून दाखवली होती. निमगाव (केतकी) येथील कुस्ती आखाड्यात त्यांनी एक काळ आपल्या कुस्तीमुळे हजारा कुस्ती रसिकांना सर्वोच्च खेळाचे प्रदर्शन करून मंत्रमुग्ध केले होते. या परिसरातील कुस्ती रसिकांचे नारायण पाटील हे आवडते पैलवान आहेत. यामुळेच निमगाव (केतकी) ग्रामस्थांनी माजी आमदार नारायण पाटील यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित केले. या सन्मानाबद्दल नारायण पाटील यांनी कुस्ती रसिकांचे आभार व्यक्त केले. तसेच कुस्तीसाठी आपण सतत योगदान देत राहणार असून पूर्वी एक पैलवान म्हणून प्रत्यक्ष मैदानात खेळ करत योगदान लिदे तर आता लोकप्रतिनिधी म्हणून कुस्ती क्षेत्रातील प्रश्न सोडवून या क्रिडा प्रकाराला आणि कुस्तीगीरांना राज्यमान्यता, सन्मान व गतवैभव मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे बोलून दाखवले.

या पुरस्कार वितरण प्रसंगी महाराष्ट्र केसरी बालारफी शेख तसेच पाटील गटाचे प्रवक्ते सुनील तळेकर तसेच पैलवान नारायण पाटील कला क्रिडा मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !
भव्य डिस्काउंट ऑफर
सर्व प्रकारच्या ब्रॅन्डेड वस्तु खरेदीवर कमीत कमी
10% पासून 51% पर्यंत एमआरपीवर डिस्काउंट
(ऑफर कालावधी : ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत)
सोबत लकी ड्रॉ व्दारे 1 ग्रॅम सोने मिळविण्याची सुवर्णसंधी !



टीप : नियम, अटी व डिस्काउंट ऑफर समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !
॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू
। किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन ॲन्ड स्वीटस् । बेकरी ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस् । नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम ॲन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य ।
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमॅट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

# संतोष पोतदार यांना उत्कृष्ट केंद्रप्रमुख पुरस्कार प्रदान




करमाळा(सं.प्र.) : भारत स्काऊट गाईडच्या वतीने दिला जाणारा जिल्हास्तरीय उत्कृष्ट केंद्रप्रमुख पुरस्कार केंद्रप्रमुख संतोष पोतदार यांना शिक्षण अधिकारी सुलभा वटारे यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, विस्तार अधिकारी सुग्रीव नीळ, जयवंत नलवडे, केंद्रप्रमुख अमृत सोनवणे, जिल्हा संघटक श्रीधर मोरे, अनुसया सिरसाठ, तृप्ती अंधारे, दत्तात्रय गाजरे आदी उपस्थित होते. संतोष पोतदार यांनी जातेगाव केंद्रातील १२ शाळेमधील जास्त विद्यार्थी नोंदणी करून विविध उपक्रमांद्वारे केंद्रात विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष मिलींद फंड, बाळासाहेब नरारे, महादेव फंड, माजी नगरसेवक अतुल फंड, संतोष वारे, मुख्याध्यापक पोपट थोरात, केंद्रप्रमुख रमाकांत गटकळ, सुहास कांबळे, अशोक बरडे, डॉ.महेश वीर, जिल्हा संचालक हनुमंत सरडे, चंद्रहास चोरमले, चेअरमन आदिनाथ देवकते, अरूण चौगुले, शिवाजी लोकरे, गणेश आडेकर, चंद्रकांत वीर, महादेव शिंदे, चेअरमन सतीश कांबळे, केंद्रप्रमुख विकास काळे, जहांगीर सय्यद, महेश होनकळसे, गर्जे सर, शिवाजी येडे, हौसराव काळे, नाना वारे, बापू भगत, स्वप्नील पाटील यांनी संतोष पोतदार गुरूजी यांचे अभिनंदन केले.

# जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत समृध्दी सिरसट हिचे अभूतपुर्व यश



करमाळा(सं.प्र.) : जिल्हापरिषद प्राथमिक शाळा पापरी (ता.मोहोळ) येथे झालेल्या जिल्हास्तरीय टॅलेंट हंट स्पर्धेअंतर्गत घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत वरकटणे येथील जिल्हापरिषद प्राथमिक शाळेतील चौथी मधील विद्यार्थीनी समृध्दी संतोष सिरसट हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. संपूर्ण जिल्ह्यातून आलेल्या स्पर्धकां-मधून तिने हे यश मिळवले आहे.

मागील वर्षी देखील समृध्दीने वक्तृत्व व कथाकथन स्पर्धेत जिल्हास्तरावर करमाळा तालुक्याचे प्रतिनिधीत्व केले होते.

या स्पर्धेसाठी समृध्दी हिला मुख्याध्यापक काटूळे मॅडम, वर्गशिक्षक आखाडे सर, सिरसट सर, व्हटकर सर, क्षीरसागर मॅडम, भापकर मॅडम, चौगुले मॅडम, मोरे सर, सुचिता सिरसट यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल गटविकास अधिकारी श्री.सारंगकर, गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, विस्तार अधिकारी श्री.नलवडे, श्री.नीळ, केंद्रप्रमुख श्री.बदर, सरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य तसेच गावातील प्रतिष्ठीत नागरीक व मान्यवरांनी समृध्दी सिरसट हिचे विशेष अभिनंदन केले.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
fastrack
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

डॉ.राऊत दातांचा दवाखाना
Advanced dental Clinic & Root Canal Center
Smile with confidence
उपलब्ध सुविधा...
• इंटराओरल कॅमेराद्वारे तपासणी
• डिजीटल एक्स-रे
• अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
• वेदनारहित दात व दाढ काढणे
• पडलेले दात बसविणे
• दात साफ करणे
• दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे
डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस. (डेन्टल सर्जन)
उपलब्ध सुविधा...
• स्क्रुच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
• अक्कलदाढ काढणे
• वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
• अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
• हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
• कॉस्मेटिक ट्रिटमेंट
• कर्करोगाचे निदान
• गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी
महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)

# गुरूकुल पब्लिक स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



करमाळा(सं.प्र.): येथील गुरूकुल पब्लिक स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. नर्सरी ते आठवी पर्यंतचे विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग नोंदवला. हे स्नेहसंमेलन दोन टप्प्यात संपन्न झाले. पहिल्या टप्यामध्ये नर्सरी ते दुसरी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत आपले कलागुण सादर केले तर दुसऱ्या टप्प्यात तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी आपले कलागुण सादर केले.

सांस्कृतिक कार्यक्रमात सन १९५५ ते १९९९ दरम्यानची गाणी होती. शम्मी कपूर, शशी कपूर, अमिताभ बच्चन, रेखा, माधुरी यासारख्या दिग्गज कलाकारांच्या गाण्यांचा समावेश थीममध्ये करण्यात आलेला होता. यामध्ये २२ गाणी बसविण्यात आली होती. या गाण्यांमधून विद्यार्थ्यांनी ओल्ड इज गोल्ड म्हणजे जुनं ते सोनं हे दाखवून दिले. दुसऱ्या टप्प्यातील विद्यार्थ्यांनी कलर्स ऑफ इंडिया या थीमवर आधारीत सर्व गाणी बसवलेली होती. याद्वारे प्रत्येक राज्याची संस्कृती, भाषा, राहणीमान, चालीरिती, देशातील विविधतेत एकता दाखवण्याचा प्रयत्न गुरूकुल पब्लिक स्कुलने केला. शेवटी वंदेमातरम् घेऊन कार्यक्रम संपन्न झाला. पाहुण्यांचे स्वागत संस्थेचे संस्थापक भोगे सर व भोगे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भगत मॅडम यांनी केले तर सुत्रसंचालन पवार मॅडम, शिंदे मॅडम यांनी केले.

न्यु संगम हॉटेल & बेकर्स
प्रोप्रा : संदीप चुंग (9860670816)
मिठाई, नमकीन बरोबर आता
■ वाढदिवसाचे केक
■ सुट्टी खारी, टोस्ट, बटर, ब्रेड
■ मस्का पाव व वाटी केक
मिळतील. एकवेळ अवश्य भेट द्या..!
पत्ता : पंजाब वस्ताद चौक, करमाळा.

# खासदार निधीतून तालुक्यासाठी १.९० कोटी निधी मंजूर : गणेश चिवटे



करमाळा(सं.प्र.) : खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या निधीतून करमाळा तालुक्यासाठी १.९० कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे; अशी माहिती भाजपाचे जिल्हा सरचिटणीस तथा सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्य गणेश चिवटे यांनी दिली.

याबाबत चिवटे म्हणाले, की खासदार नाईकनिंबाळकर यांनी राज्य सरकारच्या २५-१५ व १२-३८ या योजने अंतर्गत करमाळा तालुक्यासाठी १ कोटी ९० लाख रुपयांचा निधी विकासकामांसाठी मंजूर केला आहे. या निधी मधून आवाटी, कंदर, केम, चिखलठाण, जिंती, तरटगाव, पोमलवाडी, भालेवाडी, वांगी नं.३, वांगी नं.४, करंजे, झरे, बिटरगाव श्री, मोरवड, मिरगव्हाण या गावामधील लोकपयोगी विकास कामे केली जाणार आहेत.

**मंजुर कामे पुढीलप्रमाणे..** आवाटी येडेश्वरी मंदिर सभामंडप - १० लाख, कंदर पवार घर ते विठ्ठल मंदिर मार्ग संजय थोरे घर रस्ता-१० लाख, केम भैरवनाथ मंदिर सभा मंडप - १० लाख, केम हनुमान मंदिर समोर सभामंडप - १० लाख, चिखलठाण सुराणा घर ते उंबरे रस्ता काँक्रीटीकरण - १० लाख, चिखलठाण अर्जुन टिंगरे घर ते जि.प.शाळा रस्ता सिमेंटीकरण - १० लाख, जिंती ते पोमलवाडी रस्ता डांबरीकरण - १० लाख, जिंती गाव ते रेल्वेस्टेशन रस्ता काँक्रीटीकरण - १० लाख, तरटगाव सभामंडप - १० लाख, पोमलवाडी वाचनालय सभागृह - १० लाख, भालेवाडी ते जुने गावठाण रस्ता - १० लाख, वांगी नं.३ सातव दुकान ते पांडेकर घर रस्ता - १० लाख, वांगी नं.४ तांबोळी घर ते ढवळे घर रस्ता - १० लाख, रांझनी ओंकारनाथ देवस्थान पेवर ब्लॉक - १० लाख, करंजे व्यायाम शाळा बांधणे - ५ लाख, झरे अमृळे वस्ती ते बागल वस्ती रस्ता - ५ लाख, झरे चौधरी वस्ती हातपंप ते चंद्रकांत चौधरी रस्ता काँक्रीटीकरण - १० लाख, बिटरगाव श्री जुना करमाळा रस्ता सुधारणे - १० लाख, मोरवड व्यायाम शाळा बांधणे - १० लाख, मिरगव्हाण स्मशानभुमी सुशोभिकरण - १० लाख, मिरगव्हाण जुने गावठाण ते शिरसाट महाराज रस्ता - १० लाख. असे विविध विकासकामे मंजुर केल्याबद्दल करमाळा तालुक्यातील जनतेमधून त्यांचे आभार मानले जात आहे. पुढील काळात खासदार निधीतून विकासकामांसाठी आणखी निधी उपलब्ध करून देणार असून तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण प्रयत्नशील राहू; असेही गणेश चिवटे यांनी सांगितले.

# कै.भालचंद्र पाठक यांच्या श्रध्दांजलीपर ३० डिसेंबरला शोकसभा



करमाळा(सं.प्र.) : अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे मध्य महाराष्ट्र प्रांताचे उपाध्यक्ष कै.भालचंद्र पाठक यांच्या श्रध्दांजलीपर शोकसभा ३० डिसेंबरला दुपारी तीन वाजता यशकल्याणी सेवाभवन पुणे रोड, करमाळा येते आयोजित करण्यात आली आहे. तरी पाठक सरांविषयी आदर आणि प्रेम असलेल्या विविध क्षेत्रातील पदाधिकारी, मान्यवर, नागरीक, त्यांचे विद्यार्थी तसेच त्यांचे कुटूंबियांवर प्रेम करणारे बंधू भगिणींनी कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे; असे आवाहन अखिल भारतीय ग्राहक पंचायत करमाळा यांचे वतीने करण्यात आले.


श्री गजानन अगरबत्ती

- सुगंधी अगरबत्ती • कापूर
- अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !



पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)



महाराष्ट्रात प्रथमच...

गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...
आता जुन्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !




एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बॅंकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.



खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर

बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)

आता आपल्या करमाळ्यात !

उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन • डिलीव्हरीनंतर उद्‌भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्‌भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे • संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे • संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे • भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरुवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड
करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदव्योत्तर : मुंबई



विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.


नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862

बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.


# नॅक समितीकडून भारत महाविद्यालयास बी प्लसचे मानांकन

करमाळा(सं.प्र.) : जेऊर येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळाच्या भारत महाविद्यालयास बेंगलोर येथील नॅशनल ॲसेसमेंट ॲन्ड ॲक्रेडिटेशन कौन्सिल (नॅक) या संस्थेने भेट देऊन महाविद्यालयाच्या मुल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण केली. या संपूर्ण मुल्यांकन प्रक्रियेमध्ये महाविद्यालयास बी प्लस मानांकन प्राप्त झाले आहे. यावेळी नॅक पिअर टीमने भारत महाविद्यालयातील प्राध्यापकांची शैक्षणिक अर्हता, संशोधन कार्यातील प्रगती, अध्यापन, अध्ययन व मुल्यमापन यातील प्रगती, महाविद्यालयातील आजी-माजी विद्यार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद, व्यवस्थापनाचे महाविद्यालयास असलेले सहकार्य आदी बाबतीत समाधान व्यक्त केले. भारत महाविद्यालयास फेब्रुवारी २०२३ मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या ट्रिपल ए समितीकडून नुकतेच अ दर्जाचे मानांकन मिळाले आहे. नॅक समितीकडून आता बी प्लस मानांकन प्राप्त झाले आहे. या संपूर्ण मुल्यांकन प्रक्रियेमध्ये अंतर्गत मुल्यामापन समितीचे समन्वयक म्हणून डॉ.रमेश पाटील यांनी काम पाहिले.

# भावपूर्ण श्रध्दांजली



कै.भालचंद्र पाठक (सर)

आज सर्व काही असल्याची
जाणीव आहे
पण.. सर तुम्ही नसणं
ही सर्वात मोठी उणीव आहे

अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे प्रदेश उपाध्यक्ष व आमचे मार्गदर्शक **कै.भालचंद्र पाठक (सर)** यांचे दु:खद निधन झाले. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो, हीच आमची प्रार्थना !

शोकाकुल
**अखिल भारतीय ग्राहक पंचायत**
**शाखा-करमाळा.**


युवक नेते
आशिर्वाद
युवकांचे नेते व सामाजिक कार्यकर्ते
मा.श्री.
महादेव(आण्णा) फंड
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
मा.नगरसेविका
हार्दिक शुभेच्छा
29 डिसेंबर
शुभेच्छुक
डॉ.महेश वीर, हर्षद वीर, संतोष बादाडे, संतोष पोतदार, बाळासाो नरारे सर, सलीम पिंजारी, अमजद शेख, संजय ठेंगडे
औदुंबर माकुडे, इमत्याज शेख, एकनाथ इंदलकर, अकलाख नदाफ, चंद्रकांत फंड, भोजराज फंड, विनोद फंड, किरण राणे
सुनील जाधव, वसीम बागवान, वाहिद झारेकरी, भास्कर इंदुरे, नवनाथ इंदलकर, रामचंद्र कुकडे, सोमनाथ कुंभार, नवानथ कुंभार


श्री.ज्ञानेश्वर वाचन मंदिर मुक्तद्वार वाचलनालय
करमाळा नगरपरिषद, करमाळा मार्फत चालविण्यात
येणाऱ्या अभ्यासिकेत MPSC चा अभ्यास करणारे
श्री.दत्तात्रय संजय बदे हे
दुय्यम निबंधक श्रेणी-१ मध्ये राज्यात सहावा
तर ओबीसी मध्ये राज्यात पहिला तसेच
राज्य विक्रीकर निरीक्षक (SIT) या दोन्ही परीक्षा
एकाचवेळी उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचे
हार्दिक अभिनंदन !
श्री.दत्तात्रय संजय बदे
(कार्यालयीन अधिक्षक, क.न.प.)
शुभेच्छुक
श्री.दत्तात्रय भिकु घोलप (ग्रंथपाल), श्री.प्रदीप बाबुशा चौकटे (ग्रंथालय मदतनीस)
श्री.अमोगसिध्द सिध्दाराम शेट्टी (ग्रंथालय सेवक) व अभ्यासिकेतील सर्व विद्यार्थी
श्री ज्ञानेश्वर वाचन मंदिर मुक्तद्वार वाचनालय, क.न.प. करमाळा.


25 वे पुण्यस्मरण
काळाचा महिमा काळच जाणे
कठीण तुमचे अचानक जाणे
आजही घुमतो स्वर तुमचा कानी
वाहताना श्रध्दांजली...
डोळयात येते पाणी !
पुण्यस्मरण दिनानिमित्त
तुझ्या स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !
स्व.दिपक(बापू) आत्माराम पाटील
(जन्म दि.३१/३/१९७६ गुढीपाडवा)
(मृत्यू दि.२/१२/१९९८ दत्तजयंती)
शोकाकुल
आत्माराम गोविंद पाटील (काका), वैभव आत्माराम पाटील
सौ.मोहिनी सतीश देशमुख(वेळापूर) परिवार, आप्तेष्ट, मित्रमंडळ
वांगी नं.१, ता.करमाळा., जि.सोलापूर


29 डिसेंबर
आजचा दिवस आहे खास
तुम्हाला उदंड, सुखमय
आणि निरोगी आयुष्य लाभो
हाच मनी ध्यास..!
आमचे मित्र
श्री.महादेव(आण्णा) फंड
यांना वाढदिवसाच्या... मा.नगरसेविका
हार्दिक शुभेच्छा
श्री.गणेश जाधव
श्री.रामचंद्र कुकडे
शुभेच्छुक
गणेश जाधव चेअरमन, शेलगाव वि.का.सोसायटी


श्री बनशंकरी मोबाईल शॉपी,करमाळा
२०२४ नवीन वर्ष साजरी करू
भरघोस डिस्काउंट व असंख्य बक्षीसा सोबत
स्मार्ट टीव्ही
मिक्सर
होमथेटर
मोबाईल वर मोबाईल फ्रि
स्मार्ट वॉच
ब्युटूथ हेडफोन्स
पॉवरबॅंक
सांऊड
BAJAJ FINSERV
ZERO DOWNPAYMENT
E-XCHANGE
MOBILE EXCHANGE
2 वर्ष वॉंटरी
2 YEARS WARRANTY
प्रो.प्रा.बच्चूशेठ मो.9890014223,9623252585,7276233783


उत्कृष्ट कामकाज केल्याबद्दल जातेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख व आमचे जिवलग मित्र
मा.श्री.संतोष पोतदार गुरूजी
यांना जिल्हास्तरीय 'आदर्श केंद्रप्रमुख' पुरस्कार मिळाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
लक्ष्मण लष्कर (मुख्याध्यापक, जि.प.शाळा करंजे)
बाळासाहेब नरारे सर, डॉ.महेश वीर, नितीन काळे, बाळासाहेब देशमाने
सुजित(तात्या) बागल, सुहास कांबळे, सतीश कांबळे,
अशोक बरडे, सतीश वीर


करमाळा भूषण
आमदार
मार्गदर्शक
मा.चेअरमन, अर्बन बँक
अध्यक्ष, विद्या विकास मंडळ
युवकांचे नेते व सामाजिक कार्यकर्ते
मा.श्री.
महादेव(आण्णा) फंड
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
मा.नगरसेविका
हार्दिक शुभेच्छा
29 डिसेंबर
शुभेच्छुक
महादेव(आण्णा) फंड मित्र मंडळ, करमाळा.

# अभ्यासू व धाडसी व्यक्तीमत्व गमावले..!

भालचंद्र पाठक सर हे करमाळा तालुक्यासाठी लाभलेलं अभ्यासू व धाडसी व्यक्तीमत्व होते. ज्यांच्या शब्दांमध्ये धार होती आणि विचारांमध्ये सर्वसामान्यांची कदर होती. त्यांच्यामध्ये त्वेषाने लढण्याची हिंमत होती असे आदरणीय भालचंद्र पाठक सर २३ डिसेंबरला सर्वांना सोडून गेले.

असं म्हटलं जातं.. "ना सत्ता साथ आती है, ना संपत्ती साथ आती है। इन्सायित की सनद, हर हाल मे साथ निभाती है ।।" अशा पध्दतीने आयुष्यामध्ये सरांनी सत्ता आणि संपत्ती या गोष्टी कधीही पाहिल्या नाहीत. केवळ सर्वसामान्यांचा प्रश्न समोर घेऊन ग्राहक पंचायतच्या माध्यमातून सर्वांना मदत करण्याच्या दृष्टीने त्यांनी आपलं आयुष्य वेचलं. शिक्षक म्हणून काम करताना ते सदैव दक्ष राहिले. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ मार्गदर्शन केलं नाही तर अडचणीला उभे राहून त्यांच्या समस्या सोडवल्या.



आयुष्यात नुसती गुणवत्ता उपयोगी पडत नाहीतर वेळेचं भान ठेवावं लागतं. ते सरांनी समजून वेळेवर काम करण्याचा कटाक्ष ठेवला होता. सरांनी आपल्या नोकरीच्या कालावधीमध्ये शाळेमध्ये विद्यार्थ्यांवरती प्रेम केले, संस्कार दिले, दिशा दिली आणि स्वत:च्या पायावर उभा राहण्याचे ज्ञानही दिले. अशाच पध्दतीने शाळेचे काम शाळेत आणि शाळा संपली की समाज नावाच्या शाळेतील प्रत्येक माणूस नावाच्या विद्यार्थ्यांच्या समस्यांचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी आपला महत्वाचा वेळ दिला. सुदैवाची गोष्ट म्हणजे या सर्व कार्यासाठी त्यांच्या परिवाराची त्यांना पुरेपूर साथ होती आणि त्यामुळे या सर्व गोष्टी ते अतिशय मन लावून करत होते. खेड्यातील माणूस प्रश्न घेऊन आला की त्याचा प्रश्न समजावून घेऊन, त्याच्या प्रश्नाचे निराकरण करत असत. स्वत: अर्ज लिहिणे, वेळ पडल्यास टाईप करून घेणे, तो पोस्टाने पाठवून याचा खर्च स्वत: करणे आणि आलेल्या माणसाला आपल्या घरातील चहापासून त्याला न्याय मिळवून देण्याचं काम ते करत होते. प्रत्येक व्यक्तीच्या वेगवेगळ्या समस्या होत्या. कोणाच्या ग्रामपंचायतीच्या, कोणाच्या कुटूंबातील, कधी शेजारच्या अशा अनेक वेगवेगळ्या बाजूच्या समस्या सर केवळ ग्राहक पंचायत म्हणून काम करत नव्हते; तर आलेल्या माणसांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या पध्दतीने कामकाज करत होते म्हणूनच त्यांच्याकडे माणसांची गर्दी होती.

सरांचा क्रियाशील गोष्टीवरती मोठा विश्वास होता. ते गड किल्ल्यावर खूप प्रेम करत होते. संभाजीराव भिडे गुरूजींच्या मार्गदर्शना-खाली त्यांनी करमाळा तालुक्यातील अनेक युवकांना बरोबर घेऊन अनेक मोहिमा यशस्वी पार पाडलेल्या आहेत. गेल्या दहा वर्षापूर्वी त्यांना असाच हृदयविकाराचा झटका आला होता आणि त्यातूनही ते सहीसलामत बाहेर पडले. काही दिवस त्यांनी थोडी विश्रांती घेतली, पण पुन्हा ते माणसाच्या गराड्यात गुंतले आणि शेवटच्या क्षणापर्यंत ते कार्यरत राहिले. या कार्यामध्ये त्यांना कोणत्याही प्रकारे काम करताना कधी अडचण आली नाही. प्रचंड अभ्यास होता, पुस्तके वाचण्याचे वेड होते. कायदा समजून घेण्याची भुमिका होती. एखाद्या निष्णात वकिलासारखी कायद्याची माहिती त्यांना होती. तालुका विधी सेवा समितीवर ते कार्यरत असताना बैठकीत त्यांची जाणीव होत होती. ज्या गोष्टी वकिलाकडे पाहिजेत त्या गोष्टी पाठक सरांकडे होत्या, हे त्यांचे वेगळेपण होतं.

समाजामध्ये सर्वसामान्यांसाठी एक आश्वासक आणि विश्वासक अशा पध्दतीचं ते काम करत होते. अधिकारी हे सर्वसामान्यांना आपल्या स्वार्थासाठी वेगवेगळ्या पध्दतीचे त्रास देतात. सरांनी या सर्व गोष्टींना कायद्याच्या चाकोरीतून वेगवेगळ्या माध्यमातून दिलेल्या उत्तरामुळे सरांच्या बाबतीत अधिकाऱ्यामध्ये आदरयुक्त भीती होती. एमएसईबी, कृषी विभाग, कृषी कंपन्या, अन्य वेगवेगळ्या क्षेत्रातील फसवणाऱ्या लोकांना सरांची भीती वाटत होती. अशांना सर कधीच सोडत नव्हते. अनेक प्रसंगी सर स्वत: कार्यालयात जात असत आणि प्रश्न सोडवत. तहसीलदार, पोलीस कार्यालय, थोडक्यात नगरपालिकेपासून ते महसुल विभाग पर्यंतच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी सर ताकतीने लढत होते. असे लढताना त्यांनी आपल्याबरोबर कार्यकर्त्यांचं एक माहोल तयार केलं होते. शेटफळ सारख्या गावातील कार्यकर्त्यांचा ग्रुप सरांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय तत्पर झाला आहे. गजेंद्र पोळ, प्रशांत नाईकनवरे, वैभव पोळ आदी कार्यकर्ते क्रियाशील आहेत. अशाच पध्दतीने ग्रामीण भागातील वेगवेगळ्या गावातील वेगवेगळे कार्यकर्ते सरांनी उभे केले आहेत. भीष्माचार्य चांदणे सर, ॲड.शशिकांत नरोटे, सचिन साखरे, विजय देशपांडे, संजय हांडे, डॉ.जयंत कापडी, चंद्रशेखर जोगळेकर, बंडू कुलकर्णी, अभय पुराणिक, सारंग पुराणिक, परमेश्वर भोगल, चंद्रकांत पाटील सर, काका शिंदे सर, कांबळे सर, शिवाजी वीर, संभाजी कोळेकर, सदाशिव जाधव, पत्रकार विशाल घोलप, अशपाक सय्यद अशी जी अनेक मंडळी आहेत ती सरांच्या सोबत उभी राहिली. आता सरांचं कार्य चालवण्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन ठेपलेली आहे.

ज्ञानेश्वर माऊलीने एका ओवी मध्ये म्हटलेलं आहे.. "परि राया रंका पार । धरू मेहनती सानिया थोर । कडसणी करू एक सर । आनंदाचे आवरू ।।" याप्रमाणे श्रीमंत-गरीब किंवा सत्ताधारी सर्वसामान्य असा कोणताही भेद न मानता गरजवंताला ते मदत करत होते. अशा स्वरूपामध्ये त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत ग्राहकांच्या माध्यमातून काम केले. एवढेच नाहीतर आमच्या व्यसनमुक्तीसाठी सर कायम आमच्यासोबत असत. अंधश्रध्दा निर्मुलनसाठी व्ही.आर. गायकवाड यांचेसोबत असत. एवढेच काय पण वेगवेगळ्या महिला आंदोलनामध्ये, वैचारीक आंदोलनामध्ये सर सहभागी होत असत. दिशा देत असत, अनेक वेगवेगळे कार्यक्रम केले की जे कार्यक्रम भूतो न भविष्यती असे घडून आणलेले आहेत. महिलांमध्ये जागृती करून अनेक कार्यक्रम घडवून आणले आहेत. महिलादिनावेळी हजारो महिलांना एकत्र करून मेळावा घडवला. भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. गॅसबाबत प्रबोधन शिबीर, ड्रायव्हींग लायसन्स शिबीर, महिला वैचारीक चार्तुमास, क्षेत्र भेटी, आरोग्य शिबीर असे उपक्रम राबवले. त्यातूनच माधुरी परदेशी, निलीम पुंडे, रेखा परदेशी, सारीका पुराणिक, ललिता वांगडे, मंजिरी जोशी, निशिगंधा शेंडे, सुलभा पाटील अशा महिला कार्यकर्त्या घडल्या आहेत. सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची, व्यक्तीगत गुण शोधण्याची आणि त्या गुणातून त्यांना काम देण्याचे त्यांच्याकडे वेगळेपण होते. ते एक वेगळ्या प्रकारचं कौशल्य त्यांच्याकडे होते. या माध्यमातून करमाळा शहरामध्ये, तालुक्यामध्ये नव्हेतर जिल्ह्यामध्ये एक वेगळा कार्याचा माहोल सरांच्या कार्य कर्तृत्वातून निर्माण निर्माण झालेला आहे.

खरंतर सरांचं जाणं हे कुणालाच न रूचणार आहे. क्रियाशील व्यक्ती जाणं ही सर्वात मोठी हानी आहे. म्हणतात.. "मृत्युवर कोणालाच विजय मिळवता येत नाही, त्याचं कारण तो निमूटपणे वेळा सांभाळतो आणि तो त्याचं काम नकळत सर्वांच्या परस्पर करत राहतो !" अशाच पध्दतीने सरांवर काळानं घाव घातला. तालुक्याचे अतिशय समाजपयोगी, प्रेरणादायी व्यक्तीमत्व आपल्यातून हरवलं. एक आगळा-वेगळा आणि सर्व समाजाच्या दृष्टीने दिशादर्शक माणूस आज आकस्मात आपल्यातून जाऊन समाजाची फार मोठी हानी झाली आहे. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली !

**...डॉ.ॲड.बाबूराव हिरडे, करमाळा**
**Mob.9011355389**

# सुतार तालीम बांधकामासाठी २० लाखाचा निधी मंजूर



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील सुतार तालीम बांधकामासाठी आमदार संजयमामा शिंदे यांच्या स्थानिक विकास निधीतून माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या सहकार्यातून २० लाख रूपयाचा निधी मंजूर झाला आहे. लवकरच सुतार तालीमचा भुमीपूजन समारंभ माजी आमदार जयवंतराव जगताप व उद्घाटन आमदार संजयमामा शिंदे यांचे हस्ते होणार आहे. तालीम संघाला निधी मिळाल्याबद्दल नागरीकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून आ.शिंदे व श्री.जगताप यांचे विशेष आभार जगदीश परदेशी, अमोल परदेशी, नानासाहेब मोरे, भूषण परदेशी, रोहित परदेशी, गणेश परदेशी, नरसिंग परदेशी, विश्वजीत परदेशी, योगेश परदेशी, रणवीर परदेशी, संदीप परदेशी, अक्षय परदेशी, सौरभ परदेशी, सागर परदेशी, सतीश परदेशी, विशाल ठाकूर, नितीन परदेशी, आनंद परदेशी, महेश परदेशी, अरविंद परदेशी, पप्पू परदेशी, अभिजीत परदेशी, अनिरूध्द परदेशी, अलोक परदेशी आदींनी मानले.

# तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत कामोणे शाळेचे यश

करमाळा(सं.प्र.) : पंचायत समिती करमाळा आयोजित तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुलींच्या संघाने (मोठा गट) लंगडी खेळात अभुतपूर्व यश प्राप्त केले आहे. या यशामुळे या संघाची जिल्हास्तरीय लंगडी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच याच शाळेतील मुलींचा संघ लहान गटात लंगडी खेळात उपविजेता ठरला आहे. वैयक्तीक क्रिडा स्पर्धेतील बुध्दीबळ या खेळात कामोणे शाळेतील अथर्व राजेंद्र दणाणे व शर्वरी राजेंद्र दणाणे यांचा द्वित्तीय क्रमांक आला आहे. विजेत्या खेळाडूंचे गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, विस्तार अधिकारी सुग्रीव नीळ, केंद्रप्रमुख रमाकांत गटकळ, मुख्याध्यापक धिंगाणा गभाले, गजानन कुलकर्णी, राणी राऊत, मिनाक्षी शिंदे यांनी अभिनंदन केले.

इथं सौंदर्य जन्म घेतं..
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
**होलसेल साडी डेपो**
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.

घरगुती विक्रीसाठी साड्या होलदरात मिळतील
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट)
मो.7387832186

# रिटेवाडी उपसासिंचन योजनेबाबत पंधरा दिवसात माहिती घेऊ : चंद्रकांत पाटील

## जिल्हा नियोजन बैठकीत चिवटे यांनी उपस्थित केले तालुक्यातील प्रश्न



करमाळा (सं.प्र.) : सोलापूर करमाळा तालुका १३५ किलोमीटर अंतरावर असून या ठिकाणी जिल्हा पातळीवर कोणतेच अधिकारी आढावा बैठक किंवा तक्रारी ऐकून घेण्यासाठी येत नाहीत. तालुक्यातील हे प्रश्न सोडविण्यासाठी करमाळा तालुक्यात पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आढावा बैठक घ्यावी व रिटेवाडी उपसासिंचन योजनेचा प्रश्न मार्गी लावावा; अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा नियोजन मंडळाचे सदस्य महेश चिवटे यांनी बैठकीत केला. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी करमाळा तालुक्यात बैठक घेण्याचे आश्वासन देऊन रिटेवाडी उपसासिंचन बाबतीत पंधरा दिवसात सविस्तर सखोल माहिती अधिकाऱ्यांकडून घेऊ असे आश्वासन दिले.

कुकडी प्रकल्पासाठी अकराशे कोटी रूपये खर्च करून सर्व तालुक्यात कॅनॉल खोदण्यात आले आहेत. या कॅनॉलमध्ये उजनीतून पाणी टाकण्यासाठी रिटेवाडी उपसासिंचन योजनेसाठी केवळ शंभर कोटी रूपयांची आवश्यकता असून ही योजना पूर्ण झाली तर तालुक्यातील ५० हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊन दीड लाख नागरीकांचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटणार आहे. याबाबत खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या उपस्थितीत बैठक झाली होती. जलसंपदा विभागाने ही योजना सकारात्मक असल्याचा अहवाल दिला आहे. हे महेश चिवटे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. उजनी धरण व मांगी तलावावरील शेतकऱ्यांची वीज कनेक्शन तोडू नये, चालू वर्षाचा दुष्काळ निधी व पिक विमा अशी मिळून २०० कोटी रूपयांची रक्कम शेतकऱ्यांची शासनाकडून येणे असून या रकमेचे वाटप तात्काळ सुरू करावे. करमाळा शहराची हद्द वाढवून शहराबाहेर झालेली विकासित कामे व निवासी घरे नगरपालिका हद्दीत घ्यावी. नगरपालिकेतील प्रलंबित २८४ घरकुलांना तात्काळ मान्यता द्यावी, करमाळा आगारासाठी नवीन बसेस द्याव्यात, जेऊर येथे स्वतंत्र तालुका पोलीस स्टेशन करावे. कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी पणन महामंडळाकडून शेतकरी सुविधांसाठी ५० लाखाचा निधी द्यावा. करमाळा नगरपालिकेसाठी भुयारी गटार योजना, केंद्रीय अमृत जलवाहिनी योजनेतून नवीन पाणीपुरवठा योजना आणि जलशुध्दीकरण केंद्र यासाठी तांत्रिक मंजुरीसाठी रखडलेले दीडशे कोटीच्या कामांना मंजुरी द्यावी. शहरातील रंभापूरा येथे छत्रपती संभाजीराजे उद्यानासाठी व स्मारक उभा करण्यासाठी ५० लाखाचा निधी द्यावा; आदी विविध मागण्या महेश चिवटे यांनी निवेदनाव्दारे जिल्हा नियोजन बैठकीत केल्या.


# भावपूर्ण श्रध्दांजली



कै.भालचंद्र पाठक (सर)

वाटले नव्हते कोणासही असे घडून येईल !
चालता-बोलता देव तुम्हाला ऐसे नेईल !
माणुसकी, स्नेह, आधार, मायेची..
ज्या-ज्यावेळी चर्चा होईल त्या-त्यावेळी
'सर' सर्वात पहिली तुमचीच आठवण येईल !

अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे प्रदेश उपाध्यक्ष व आमचे मार्गदर्शक **कै.भालचंद्र पाठक (सर)** यांचे दु:खद निधन झाले. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो, हीच आमची प्रार्थना !

शोकाकुल

**गुरू कॉम्प्युटर**

जीन मैदान शॉपींग सेंटर, गाळा नं.४२, करमाळा.(प्रोप्रा : अभय पुराणिक)



**E - AUCTION SALE**

Hari Ramchandra e-Auctioneers Pvt.Ltd,

Off.Add : Shop No.69,Aditya Shagun Mail, Bavdhan, Pune 411021 (M.S.) email - hreauctioneers@gmail.com

**श्री आदिनाथ सहकारी साखर कारखाना लि; शेलगाव-भाळवणी**

आदिनाथनगर, पो.जेऊर ४१३२०२, ता.करमाळा, जि.सोलापूर

दि.७/१/२०२४ रोजी दु.१.०० वा. आमचे संकेतस्थळWWW.hrauctioneers.com वर ई-लिलावाद्वारे स्क्रॅप मटेरियलची विक्री केली जाईल. नोट :

१) मालाची पाहणी :- दि.५ व ६ जानेवारी २०२४ पर्यंत सुट्टीचे दिवस सोडून करता येईल.
२) पार्टीसिपेशन फी कारखान्याच्या अकौंटमध्ये डी.डी. स्वरूपात दि.६ जानेवारी २०२४ सायं. ५.०० वाजेपर्यंत जमा करावी.
३) संपूर्ण मटेरियलची माहिती, बिडर फॉर्म व अटी व शर्तीसाठी वरील संकेत स्थळावर संपर्क साधावा

**Mob No : 9850753434 / 8149187647** email : hreauctioneers@gmail.com


# राज्यपातळीवरील मल्लखांब स्पर्धेसाठी सुमित सरक याची निवड



करमाळा(सं.प्र.) : जेऊर येथील भारत हायस्कुल मधील सुमित सरक याची राज्य पातळीवरील मल्लखांब स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रिडा व युवक सेवा संचालनालय म.राज्य पुणे आणि जिल्हा क्रिडा कार्यालय सोलापूर यांचे संयुक्त विद्यमाने टेंभूर्णी येथे पुणे विभागीय शालेय मल्लखांब व रोप मल्लखांब स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत जेऊर येथील भारत हायस्कुल मधील आठवीतील विद्यार्थी सुमित सरक हा १४ वर्षे आतील मुलांच्या गटात सहभागी झाला होता. त्यामध्ये तो विजयी झाला असून त्याची उदगीर (जि.लातूर) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय मल्लखांब व रोप मल्लखांब स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या स्पर्धेसाठी सुमिक सरक यास मल्लखांब असोसिएशनचे राज्य सहसचिव व आंतरराष्ट्रीय पंच पांडूरंग वाघमारे, बाळासाहेब शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. मार्गदर्शक शिक्षक व सुमित सरक याचे अभिनंदन भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व माजी आमदार नारायण पाटील, उपाध्यक्ष राजूशेठ गादीया, सचिव प्रा.अर्जुनराव सरक, सरपंच पृथ्वीराज पाटील, संस्था सदस्य सुनील तळेकर, प्राचार्य दहिभाते, उपप्राचार्य नागेश कांबळे, पर्यवेक्षक बी.एस.शिंदे यांनी केले.




संयमी, कुशल नेतृत्वातून राजकीय, सामाजिक क्षेत्रातील लोकप्रिय व्यक्तीमत्व

**मा.महादेव(आण्णा) फंड**

आपणांस दि.२९ डिसेंबर रोजी असलेल्या वाढदिवसानिमित्त...

**हार्दिक शुभेच्छा !**



भोजराज फंड

शुभेच्छुक

- **विश्वजित युवा मित्र मंडळ** फंडगल्ली, करमाळा.
- **नटराज पान सेंटर** पुणे रोड, करमाळा प्रोप्रा : भोजराज फंड



MEHER EYE & DENTAL HOSPITAL

**मेहेर नेत्र अॅन्ड दंत हॉस्पिटल**

बायपास रोड, शिंदे हॉस्पिटल शेजारी, करमाळा. मो.७८७५६१९६९६

| डॉ.हितेश बाळासाहेब मेहेर | डॉ.नेहा हितेश मेहेर(देवकर) | डॉ.पुनम शैलेश मेहेर(गोरे) |
|---|---|---|
| MBBS. MS OPHTHALMOLOGY | BDS (DENTAL SURGEON) | BDS (DENTAL SURGEON) |

- कॉम्प्युटरद्वारे नेत्र तपासणी
- मोतीबिंदू, काचबिंदू(फेको) स्पेशालिस्ट
- अद्ययावत ऑपरेशन थिएटर
- रूट कॅनाल ट्रीटमेंट,
- कवळी बसविणे, बालदंत समस्या
- हिरड्यांची शस्त्रक्रिया

**अनंत ऑप्टीशियन्स**

डॉ.आंबेडकर शॉपींग सेंटर, भाजी मंडई जवळ करमाळा.(९४२३३३३९६०, ९९६०९७७३०६)

-सर्व प्रकारच्या नंबरचे चष्मे,
-गॉगल्स मिळतील. अत्याधुनिक
-मशिनद्वारे चष्मे फिटींग

# अपघातात चार ठार - २० वर्षाच्या कार चालकावर गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : देवदर्शन करण्यासाठी तवेरा गाडीतून निघालेल्या कुंभार परिवाराला अपघाताने घेरले अन् त्यात चौघेजण जागीच ठार झाले आहेत. हा अपघात पांडे परिसरात फिसरे गावाच्या वळणाजवळ पहाटे साडेपाचच्या सुमारास घडला आहे. यात २० वर्षाच्या तवेरा गाडीच्या चालकावर पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

यात हकीकत अशी, की शशीकुमार चंद्रशहा कुंभार व त्यांच्या परिवारातील आठजण देवदर्शनासाठी म्हणून महादेवनगर, बनशंकरी शाळेजवळ गुलबर्गा येथून २६ डिसेंबरला रात्री ते तवेरा कार क्र.के.ए.३२ एन ०६३१ मधून निघाले होते. पहाटे साडेपाचच्या सुमारास कार चालकाचा कारवरील ताबा सुटला व सदरची तवेरा गाडी डाव्या बाजुने कंटेनर क्र.आर.जे.०६ जीसी २४८६ यावर जाऊन धडकली. त्यानंतर सदरची तवेरा पलटी होऊन रस्त्याच्या खाली चेंदामेंदा होऊन पडली आहे. यात १) श्रीशैल चंद्रशहा कुंभार (वय-५६), २) सौ.शशिकाला श्रीशैल कुंभार (वय-५०) दोघे रा.बनशंकरी शाळेजवळ, महादेवनगर, गुलबर्गा ३) सौ.ज्योती गुरूदेव हुनशालमठ (वय-३८, रा.बागलकोट) ४) श्रीमती शारदा गंगाधर हिरेमठ (वय-६७, रा.हुबळी) यांचे जागीच निधन झाले आहे. यात सौम्या श्रीधर कुंभार (वय-२६), कावेरी विश्वनाथ कुंभार (वय-२४), शशिकुमार त्रिशाला कुंभार (वय-३६), श्रीदार श्रीशैल कुंभार (वय-३८), नक्षत्रा विश्वनाथ कुंभार (वय-८ महिने) व चालक श्रीकांत राजकुमार चव्हाण (वय-२०) यांचे वरती उपजिल्हा रूग्णालयात डॉ.गजानन गुंजकर व डॉ.राहुल कोळेकर यांचे मार्गर्शनाखाली उपचार चालू आहेत. या प्रकरणी शशीकुमार श्रीशैल कुंभार (रा.गुलबर्गा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की कार चालक श्रीकांत राजकुमार चव्हाण याने रस्त्याची परिस्थिती न पाहता भरधाव वेगात गाडी चालवून कंटेनरला धडक देऊन गाडीचा अपघात केला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.बंडगर हे करत आहेत. घटना घडल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील तसेच पोलीस निरीक्षक जोतीराम गुंजवटे यांनी घटनास्थळी भेट दिली आहे.कारचालक हा अवघा २० वर्षाचा असून त्याला मे २०२३ मध्ये गाडी चालविण्याचा परवाना मिळाला आहे. चालकाच्या दुर्लक्षितपणामुळे हा अपघात घडल्याबाबत प्रथमदर्शनी दिसून येते. तवेरा गाडीचा अक्षरश: चुराडा झाला आहे. अन्य जखमींना येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# जनावरांना निर्दयपणे वागणुक देणाऱ्या दोघांविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.) : जनावरांना गर्दी करून उभे करणे, चारा-पाणी न देणे, औषधाची व्यवस्था न करणे, केवळ कत्तल करण्यासाठी त्यांना निर्दयपणे वागणूक देणाऱ्या दोघांविरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबतची फिर्याद पोलीस हवालदार अजित दशरथ उबाळे यांनी दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २६ डिसेंबरला सायंकाळी पावणेसहा वाजता पोलीस उपनिरीक्षक माहूरकर यांना गायरानातील पत्राशेडमध्ये कत्तल करण्यासाठी गोवंश जातीचे जनावरे घेऊन जाणार असल्याचे समजले. त्यानंतर आम्ही मौलालीमाळ येथे पोलीस हवालदार शेळके, पोलीस नाईक ढवळे, पोलीस कॉन्स्टेबल काझी, शिंदे, जगताप, गटकुळ असे सर्व पंचासह खाजगी वाहनाने मौलालीमाळावर गेलो असता तेथे एका पत्र्याच्या शेड मध्ये ४६ लहान जर्सी गायीचे खोंडे , दोन मोठे बैल व एक पांढरा खिल्लारी बैल अशी ४९ जनावरे दाटीने कोंडून त्यात चारापाण्याची सोय न करता औषधाची सोय न करता शाहरूख आयुब कुरेशी व अलिम रफिक कुरेशी दोघे रा.मौलालीमाळ यांनी आणून ठेवलेली होती. या सर्वांच्या विरूध्द प्राण्याचा छळ प्रतिबंधक अधिनियमानूसार फिर्याद देण्यात आली आहे. यात पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू भरून घरपोच वर्षभर अंक मिळवा..!

खोटे कागदपत्र व खोटा दस्त करून

# फसवणूक प्रकरणी जेऊर येथील दोघांवर गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : खोटे कागदपत्र करून व खोटा दस्त करून फसवणूक केल्या प्रकरणी जेऊर येथील दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. हा गुन्हा न्यायालयाच्या आदेशानंतर पोलीसांनी दाखल केला आहे.

या प्रकरणी डॉ.हेमंत पांढरे (जेऊर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की जेऊर येथील शासकीय जागेवर जेऊरचे ग्रामविकास अधिकारी यशवंत बबन कुदळे यांनी भास्कर पांडूरंग कांडेकर यांचे नाव लावून ग्रामपंचायती चा नमुना नं.८ चा उतारा दिला. त्यानुसार श्री.कांडेकर यांनी मला सदरची जागा ३ नोव्हेंबर २०२१ रोजी विक्री केली आहे. प्रत्यक्षात श्री.कांडेकर यांच्या मालकीची जागा नसताना यशवंत कुदळे यांनी खोटा उतारा दिला व श्री.कांडेकर यांनी ती जागा मला विक्री करून माझी फसवणूक केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

ऊसतोड मजूर देतो म्हणून

# पाच लाखाची फसवणूक

करमाळा (सं.प्र.) : ऊस तोडीला मजूर देतो म्हणून पाच लाख रूपये घेऊन फसवणूक करणाऱ्या विरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी दादासाहेब गोरख मुरूमकर (रा.बिटरगाव श्री) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझ्याकडे मॉसी कंपनीचा ट्रॅक्टर असून मी पाच वर्षापासून विठ्ठल कारखाना, पिंपळनेर येथे ऊस वाहतूक करण्याचे काम करतो. ऊसतोड मजुरांची गरज भासल्याने मी प्रकाश विठ्ठल माळी (रा.पांगरी, ता.बार्शी) याच्याशी संपर्क केला असता, त्याने १८ ऊसतोड कोयते मजूर पुरवतो असे सांगून माझ्याकडून आठ लाख रूपये घेतले व त्यानंतर अवघे आठ मजूर पुरविले. उर्वरित मजूर देतो म्हणून दिले नाही. या मजुरांनी फक्त तीन लाख रूपयाचे काम केले आहे. उर्वरित पाच लाख रूपये प्रकाश माळी यांनी दिले नाही. त्यांनी सदर रकमेचा अपहार केला आहे. यात पोलीसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

ऊसतोड मजूर देतो म्हणून


# तीन लाखाची फसवणूक

करमाळा(सं.प्र.) : ऊस तोडीला मजूर देतो म्हणून तीन लाख रूपये घेऊन फसवणूक करणाऱ्या विरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी मारूती शंकर पाचवे (रा.बिटरगाव वांगी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याकडे चिटबॉय म्हणून काम करतो. माझ्याकडे स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर असून तीन वर्षापासून विठ्ठल कारखान्यास ऊस वाहतूक करण्याचे काम करतो. ऊसतोड मजुरांची गरज भासल्याने मी किसन फुलसिंग गेंदरे (रा.निमगुल, ता.सिंधखेडा, जि.धुळे) याच्याशी संपर्क केला असता, त्याने १४ ऊसतोड कोयते मजूर पुरवतो असे सांगून माझ्याकडून तीन लाख रूपये रोख घेतले व त्यानंतर मजूर पुरवतो असे म्हणून मजुरही दिले नाही व पैसेही दिले नाहीत. यात पोलीसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चालू आहे.

# किरकोळ कारणावरून पतीकडून पत्नीस बेदम मारहाण

करमाळा (सं.प्र.) : तु रात्री मला न सांगता कोठे गेली.. असे विचारून पतीने पत्नीस लोखंडी गजाने बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार २४ डिसेंबरला रविवारी सकाळी सात वाजता पांगरे येथे घडला आहे.

या प्रकरणी रेखा तानाजी शिंदे या महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की २३ डिसेंबरला संध्याकाळी पती तानाजी सुभाष शिंदे हा दारू पिऊन घरी आला व तो वाद घालू लागला. त्यामुळे मी माझ्या मुलांना घेऊन शेजारच्या वस्तीवर मुक्कामी गेले. २४ डिसेंबरला सकाळी मुलासह घरी आले असता, तु मला न सांगता कोठे गेली होतीस.. असे म्हणून पतीने लोखंडी गजाने त्यांना मारहाण करून जखमी केले आहे तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

JK Design Studio
आर्किटेक्ट | इंजिनियर्स | इंटेरियर
• आर्किटेक्चर ड्रॉईंग अॅन्ड डिझाईन (वास्तुशास्त्रनूसार)
• रेसिडेंशियल, कमर्शियल, इंडस्ट्रियल
• स्टील डिझाईन • बिल्डिंग परवाना
• इंटेरियर डिझाईन • बिल्डिंग कन्स्ट्रक्शन
• लॅन्डस्केप डिझाईन • कन्सल्टन्सी


पत्ता २६९०/३३९ गणेशनगर, करमाळा.
jkdesignstudio23@gmail.com
Jk_design_studio23
Er.Irshad M. Kazi (B.E.Civil) Mo.8421124858
Ar.Junaid M. Kazi (B.Arch) Mo.9975579996


गीर गाईचे प्युअर दुध मिळेल.
मो.9822058106

# उजनी धरणग्रस्तांसाठी पाणी राखून ठेवावे व शेतीपंपांना अखंडीत वीजपुरवठा द्यावा : नारायण पाटील यांची मागणी



करमाळा(सं.प्र.) : उजनी धरणग्रस्तांसाठी असलेले पाणी राखून ठेवा, जुन अखेर पर्यंत उजनी बॅक वॉटर तसेच भीमा सीना जोड कालवा परिसरातील शेतीपंपांना अखंडीत वीजपुरवठा देण्यात यावा; अशी मागणी माजी आमदार नारायण पाटील यांनी सोलापूर जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत केली.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीत नारायण पाटील यांनी वरील मुद्दा उपस्थित केला. याबाबत बोलताना ते म्हणाले, की उजनी धरणामध्ये सध्या जेमतेम नऊ टीएमसी इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. मृत पाणी साठा म्हणून असलेल्या २० टीएमसी पाण्यात गाळाचे प्रमाण जादा असल्याने हे पाणी शेतीसाठी वापरणे कठीण आहे. आता उजनीमध्ये पाणी येण्याचा कोणताही उपाय नाही. यामुळे आहे ते पाणी जुन अखेर पर्यंत राखून ठेवण्याचा निर्णय होऊ शकतो. परंतु उजनी धरणग्रस्तांना त्यांच्या हक्काचे पाच टीएमसी वापरता यावे म्हणून आगामी काळात जुन अखेर पर्यंत या भागातील वीज पुरवठा तोडला जाऊ नये. या परिसरात सर्वाधिक केळी लागवड असून वीजपुरवठा खंडीत केल्यास करोडो रूपयांचे आर्थिक नुकसान शेतकऱ्यांना होईल. यामुळे आगामी काळात होणाऱ्या संभाव्य निर्णयात आत्ताच बदल केला जावा; अशी मागणी लेखी निवेदन देऊन नारायण पाटील यांनी केली.

## साहित्यिकांना आवाहन

सा.कमलाभवानी संदेशच्या नववर्ष विशेषांकाचे काम सुरू झाले आहे. तरी साहित्यिकांनी आपले कथा, कविता, विशेष लेख असे साहित्य सा.संदेश कार्यालयात पाठवून द्यावे. **व्यवस्थापक, सा.क.भ.संदेश (मो.९०११३५५३८९)**




# कमलाई मशिनरीचे मालक रविंद्र क्षीरसागर यांचे निधन



करमाळा : येथील कमलाई मशिनरीचे मालक रविंद्र भानुदास क्षीरसागर यांचे २७ डिसेंबरला अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या मागे दोन मुले, दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सर्व क्षेत्रातील मान्यवर तसेच आप्तेट, मित्र परिवार उपस्थित होते. गणेश क्षीरसागर व नागेश क्षीरसागर यांचे ते वडील होत. त्यांचे अंत्यविधीप्रसंगी सर्व क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते. रविंद्र क्षीरसागर हे शांत व मनमिळावू स्वभावाचे होते. त्यांचे अचानक जाण्याने शहरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.



# भावपूर्ण श्रध्दांजली



**कै.रविंद्र भानुदास क्षीरसागर**
(मृत्यू दि.२७/१२/२०२३)

त्यागूनी स्नेहाच्या नाती-गोती
अनंतात विलीन झाली दिव्यजोती
संस्काराच्या आपल्या जागवत स्मृती
नित्यदिनी स्मरतो आपलीच मुर्ती

कमलाई मशिनरीचे मालक **कै.रविंद्र भानुदास क्षीरसागर** यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभो; हीच ईश्वर चरणी प्रार्थना !

**शोकाकुल**

- **गणेश रविंद्र क्षीरसागर**
- **नागेश रविंद्र क्षीरसागर**

**समस्त क्षीरसागर परिवार, करमाळा.**